# बृहन्मुंबई महानगरपालिका

## नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय

क्र.नअ/8945/ओडी/आसेप्र दि.18.08.2025

## - सूचना पत्र -

जाहिरात क्र. नअ/11852/ आसेप्र दि. 14.10.2024 अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील दुय्यम अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील एकूण 690 रिक्त पदे भरण्याकरिता ऑनलाईन परीक्षा दि.09.02.2025, दि.02.03.2025, दि.03.03.2025, दि.08.03.2025, दि.13.05.2025 व दि.14.05.2025 रोजी महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संपन्न झालेली आहे.

दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गाचा निकाल दि.11.06.2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर संवर्गाकरिता घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार, प्रवर्गनिहाय एकुण 58 उपलब्ध उमेदवारांची पडताळणीसापेक्ष तात्पुरती सामाईक निवड यादी क्र.नअ/8224/ आसेप्र दि.07.08.2025 अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उपरोक्त नमूद केल्यानुसार तात्पुरती सामाईक निवड यादीमधील एकुण-58 उमेदवारांची खालील तक्ता-'अ' येथे नमूद केल्याप्रमाणे सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची पडताळणी दि.21.08.2025 ते दि.25.08.2025 या कालावधीमध्ये (कार्यालयीन दिवशी), खालील नमूद ठिकाणी सकाळी 10.30 ते सायंकाळी 6.00 यावेळेत करण्यात येणार आहे. यास्तव, उमेदवारांस सर्व संबंधित कागदपत्रांसह खालील नमूद ठिकाणी तक्ता-'अ' येथे नमूद दिनांक व वेळेस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. तद्अनुषंगाने दि.14.08.2025 रोजी आपण ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. उमेदवाराने खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेस व दिनांकादिवशीच पडताळणीकरिता उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पडताळणीकरिता अनुपस्थित राहणा-या उमेदवारांचे नाव निवड यादीमधून कमी करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **कागदपत्रे पडताळणीकरिता उपस्थित राहावयाचे ठिकाण** | **बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,<br>विस्तारित नवीन इमारत, पाचवा मजला,<br>विकास नियोजन सभागृह,<br>महानगरपालिका मार्ग, फोर्ट,<br>मुंबई- 400 001** |

**तक्ता - 'अ'**

| दिवस | तात्पुरत्या निवड यादीतील खालील अ.क्र. वरील उमेदवार | उमेदवारांची संख्या | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 20 | 20 | दि.21.08.2025 | सकाळी 10.30 वाजता |
| 2 | 21 ते 40 | 20 | दि.22.08.2025 | सकाळी 10.30 वाजता |
| 3 | 41 ते 58 | 20 | दि.25.08.2025 | सकाळी 10.30 वाजता |

टिप - दिव्यांग उमेदवारांना नियोजित स्थळी उपस्थित राहण्यास संबंधित दिवसरोजी होणारा विलंब गृहित धरण्यात आलेला आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील सरळसेवा भरतीप्रक्रिया 2024-25 अंतर्गत उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी पडताळणी करावयाच्या दस्तऐवजांची तपासणी सूची**

| अ.क्र. | मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती |
|---|---|
| 1 | ऑन लाईन अर्ज, ई-मेल द्वारा प्राप्त झालेल्या प्रस्तुत पत्राची प्रत |
| 2 | सुस्पष्ट फोटो असलेले ओळखपत्र (उदा. मूळ पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र, पारपत्र वा इतर ओळखपत्र |
| 3 | शाळा सोडल्याचा दाखला/ कॉलेज सोडल्याचा दाखला |
| 4 | जन्म दाखला |
| 5 | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 6 | जातीचे प्रमाणपत्र |
| 7 | जात वैधता प्रमाणपत्र |
| 8 | अजा, अज व खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेणारे उमेदवार वगळता सर्व मागासप्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेला अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रांचे 2 बंच (आर्थिक वर्ष 2024-2025 व 2025-26 करिता वैध असलेले) |
| 9 | एस.एस.सी.गुणपत्रिका, उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 10 | 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| 11 | एच.एस.सी. गुणपत्रिका उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 12 | पदवी परीक्षेच्या (पास/नापास) सर्व सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका , उत्तीर्ण प्रमाणपत्र, विद्यापीठाचे प्रमाणपत्र व छायांकित गुणपत्रिका.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 13 | सरकारी नोकरीत असल्यास कार्यालय प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र. |
| 14 | विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि राजपत्र. |
| 15 | Employment Exchange कडून प्राप्त झालेले रोजगार नोंदणी कार्ड असल्यास |
| 16 | खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू संबंधित संवर्गासाठी पात्र ठरत असल्याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| 17 | दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत, किमान 40% दिव्यांगत्वाचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. |
| 18 | अनाथ उमेदवारांच्या बाबतीत, सुधारित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| 19 | 4 पासपोर्ट साईज छायाचित्र(Photograph) |
| 20 | संबंधित अन्य प्रमाणपत्रे |

**टिप -**

| | |
|---|---|
| **1** | **प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पाठविलेले हे पत्र म्हणजे नियुक्ती पत्र नाही याची कृपया नोंद घ्यावी.** |
| **2** | **उपरोक्त नमूद केलेल्या दस्तऐवज तपासणी सूचीच्या अनुषंगाने सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तसेच स्वतः प्रमाणित केलेल्या छायांकित प्रतीचा संच सोबत आणावा.** |
| **3** | **आपल्या जन्मापासून ते आजमितीपर्यंतचे वास्तव्य केल्याचे सर्व पत्ते (कालावधीसह) तसेच, सदर कालावधीतील** |

| | |
|---|---|
| | **पोलीस स्थानक/पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल आयडी इत्यादी माहिती या कार्यालयात प्रमाणपत्र पडताळणी वेळेस सादर करणे आवश्यक राहिल.** |
| **4** | **एस.एस.सी., एच.एस.सी, पदवी किंवा तत्सम परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेले असल्यास उमेदवारांनी प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे सर्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.** |
| **5** | **दस्तऐवज पडताळणीवेळी सादर करावयाची प्रमाणपत्रे/कागदपत्रे संदर्भात अधिक विस्तृत स्वरुपातील माहितीकरीता कृपया सविस्तर जाहिरातीतील मुद्दा क्र. 15.7 अवलोकावे.** |

सही/-18.08.2025
नगर अभियंता